# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.06.2026** **वारःसोमवार**

---

1. मानवकेंद्रित नवोपक्रमाला भारतात प्रोत्साहन -फ्रान्समधल्या भारत इनोव्हेटस् कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. फ्रान्समध्ये 52 व्या G7 शिखर परिषदेला आज सुरूवात,भारताच्या सहभागाची यंदा 13 वी वेळ
3. 19व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात आणि
4. महिलांच्या T20 विश्वचषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर विजय

**मोदी-स्लोव्हाकिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर आहेत. ते आज स्लोव्हाकियाची राजधानी ब्रातिस्लावा इथं स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांची तसंच राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रीनी यांचीही भेट घेऊन त्यांच्याशी व्यापार,गुंतवणूक,ऑटोमोबाईल आणि रेल्वे उत्पादन यांसारख्या विविध क्षेत्रांत स्लोव्हाकियासोबतचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीनं चर्चा करतील. 1993 मध्ये स्लोव्हाकियाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून एखाद्या भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच भेट आहे.

**पंतप्रधान**

भारतात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स आहेत; या माध्यमातून देशातील युवा पिढी विविध क्षेत्रांतील जागतिक आव्हानांवर उपाययोजना विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी संयुक्तपणे फ्रान्समधल्या निस इथं 'भारत इनोव्हेट्स' या कार्यक्रमाचं काल उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. भारताची प्रतिभा आणियुरोपीय भांडवल यांच्यामधला एक दुवा म्हणून 'भारत इनोव्हेट्स' हा उपक्रम महत्त्वाचा आहे असं मोदी म्हणाले. भारतात 'मानवतेसाठी तंत्रज्ञान' या तत्त्वाला अनुसरून मानव केंद्रित नवोपक्रमाला प्रोत्साहन दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं. फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्राँ यांनी या कार्यक्रमात बोलताना भारताच्या नवोन्मेषी उपक्रमांची प्रशंसा केली. भारत नवोन्मेषाचं जागतिक केंद्र म्हणून उदयाला आला असल्याचं ते म्हणाले.भारत इनोव्हेट्स या उपक्रमाअंतर्गत देशातील 120पेक्षा जास्त स्टार्टअप्स आणि जगभरातील आघाडीचे गुंतवणूकदार, तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज तसंच प्रमुख शैक्षणिक संस्था एकत्र आल्या आहेत.या कार्यक्रमाला परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस.जयशंकर, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, राष्ट्रीय सुरक्षितता सल्लागार अजित डोभाल, मुख्य वैज्ञानिक सल्लागार अजय कुमार सूद, इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती आणि उद्योग क्षेत्रातले अनेक मान्यवर उपस्थित होते.

**जी-7**

फ्रान्समधल्या एव्हियन इथं आज 52 वी G7 शिखर परिषद सुरू होत आहे. या तीन दिवसीय परिषदेत G7 चे सदस्य देश- कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन अमेरिका आणि युरोपियन युनियन सहभागी होत आहेत. सदस्य देशांव्यतिरिक्त, फ्रान्सनं भारत, ब्राझील, इजिप्त, केनिया, दक्षिण कोरिया, कतार,सौदी अरेबिया, सीरिया, युक्रेन आणि संयुक्त अरब अमिराती यांनाही या परिषदेसाठी आमंत्रित केलं आहे.G7 शिखर परिषदेत भारताचा सहभाग असण्याची ही 13 वी वेळ असेल.पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या या शिखर परिषदेतल्या संवाद सत्रात सहभागी होणार आहेत.आजपासून सुरू होणाऱ्या या परिषदेतल्या सत्रांमध्ये सहभागी विविध देशांचे नेते भू-राजकीय आव्हानं, आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा, संतुलित आर्थिक विकास आणि प्रमुख जागतिक संकटांवर चर्चा करतील.

**योग दिन**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आयुष मंत्रालयाच्या अधिकृत यूट्यूब वाहिनीवर काल योग प्रात्यक्षिकांचं थेट प्रसारण करण्यात आलं. या प्रक्षेपणाद्वारे मंत्रालयानं सर्वाधिक प्रेक्षक संख्येचा नवा गिनीज विश्वविक्रम नोंदवला. या विशेष जागतिक ऑनलाइन योग सत्रात 4 लाख 35 हजार 831 नागरिक सहभागी झाले. सहभागी झालेल्या जगभरातील नागरिकांचं आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केलं. हा कार्यक्रम आयुष मंत्रालयाने मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था आणि इतर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने आयोजित केला होता. कार्यक्रमादरम्यान हॅबिल्ड संघानं मार्गदर्शन केलं.

**नीट**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या नीट यूजी पुनर्परीक्षेची प्रवेशपत्रे जारी केली आहेत.विद्यार्थ्यांनी NTA च्याneet.nta.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरून प्रवेशपत्रे डाउनलोड करावीत. ही पुनर्परीक्षा येत्या 21 जूनला दुपारी 2 ते संध्याकाळी सव्वा पाच या वेळेत होणार आहे.

**विमान सेवा**

उत्तर प्रदेशमधल्या गौतम बुद्ध नगरातील जेवर इथं असलेल्या नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आजपासून व्यावसायिक विमान सेवेला सुरुवात होत आहे. पहिल्या विमानातून जेवरचे आमदार धीरेंद्र सिंह यांच्यासोबत विमानतळासाठी ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असे 172 शेतकरी प्रवास करतील. यामध्ये 20 महिलांचा समावेश आहे. लखनौला पोहोचल्यावर हे शेतकरी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतील. हे विमानतळ पश्चिम उत्तर प्रदेश, दिल्ली-एनसीआर आणि शेजारील राज्यांसाठी विमान वाहतुकीचे एक नवीन प्रवेशद्वार ठरेल अशी अपेक्षा आहे.

**जम्मू विमानतळ**

जम्मू विमानतळ आज यात्री सुविधा दिवस साजरा करत आहे. याअंतर्गत प्रवाशांसाठीच्या सोयी सुविधा वाढवणे, जनजागृती करणे आणि प्रवाशांसाठीच्या विविध सेवांचे प्रदर्शन करणे यांसारखे उपक्रम राबवले जात आहेत. देशभरातून येणाऱ्या भाविकांना आगामी श्री अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.भाविकांसाठी मदत कक्ष, माहिती केंद्रे, अतिरिक्त कर्मचारी आणि सुधारित प्रवासी व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

**मिफ**

19व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून मुंबईत सुरुवात होत आहे. या महोत्सवात भारत आणि जगभरातील माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशन पट रसिकांना पाहायला मिळणार आहेत. आजपासून 21 जूनपर्यंत हा महोत्सव सुरू राहील. महोत्सवात आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्पर्धा विभागांतर्गत चित्रपट प्रदर्शित होतील. तसंच स्पर्धा-बाह्य विशेष सत्र आणि चित्रपटसृष्टीतील तज्ज्ञांची सत्रही आयोजित केली जाणार आहेत. या वर्षीच्या महोत्सवात 'वेव्हज डॉक बाजार' हे उद्योग-केंद्रित नेटवर्किंग आणि व्यावसायिक व्यासपीठ एक प्रमुख आकर्षण असेल. या महोत्सवात पहिल्यांदाच, 'मुंबई थ्रू अ थाऊजंड आईज' या शीर्षकाखाली 'एआय सिनेमा हॅकाथॉन' आयोजित केली जाईल.

**सीआयडी**

पक्षीय आमदारांच्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याप्रकरणातल्या कथित सहभागाबाबत, गुन्हे अन्वेषण विभागानं तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांची काल नऊ तासांहून अधिक काळ चौकशी केली. सीआयडीनं काल भवानी भवन इथं तृणमूल काँग्रेसचे आमदार कुणाल घोष यांचीही चौकशी केली.

**अपघात**

महाराष्ट्रात, सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील म्हसवड–पंढरपूर मार्गावर तांदूळवाडीजवळ काल दुपारी झालेल्या भीषण अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला तर 5 जण जखमी झाले. मृतांमध्ये 5 महिला आणि 3 लहान मुलांचा समावेश

आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत पिकअप वाहन कोसळल्याने हा अपघात झाला. रांजणी इथले 14 भाविक देवदर्शन आटोपून परत येत असताना तांदूळवाडी परिसरात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यानं गाडी रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अपघाताविषयी शोक व्यक्त केला असून, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृताच्या नातेवाईकाला दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## हवामान

भारतीय हवामान विभागानं मान्सूनची आगेकूच होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाल्याचं म्हटलं आहे. येत्या चार ते पाच दिवसांत महाराष्ट्राचा आणखी काही भाग, कर्नाटक, तेलंगण, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या काही भागात मान्सून पोहोचण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. तर येत्या सहा ते सात दिवसांत पश्चिम बंगालचा डोंगराळ भाग, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय या भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.तर ईशान्य भारत आणि पश्चिम बंगालच्या काही भागांत आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## फिफा

फिफा विश्वकरंडक 2026 स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात जर्मनीने पदार्पण करणाऱ्या कुराकाओ संघाचा 7-1 असा धुव्वा उडवला. विर्ट्झच्या उत्कृष्ट पासवर जर्मन मिडफिल्डर फेलिक्स नमेचाने सहाव्या मिनिटाला गोल करून खाते उघडले. 21व्या मिनिटाला लिवानो कोमेनेन्सियाने गोल करून कुराकाओला बरोबरी साधून दिली आणि हा त्याचा विश्वचषकातील पहिलाच गोल होता. फिफा विश्वचषकातील इतर सामन्यांमध्ये, टेक्सासमधील डॅलस स्टेडियमवर झालेल्या गट 'एफ'च्या सलामीच्या सामन्यात जपान आणि नेदरलँड्स यांच्यात 2-2 अशी बरोबरी साधली.

## महिला क्रिकेट

वीस षटकांच्या महिला विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाने आपल्या मोहिमेची जोरदार सुरुवात करत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा 64 धावांनी पराभव केला.नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताने स्मृती मानधनाच्या 68,हरमनप्रीत कौरच्या 36 आणि ऋचा घोषच्या 17 चेंडूतील 34 धावांच्या जोरावर 170 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तान संघ 17 षटकात केवळ 106 धावा करू शकला.पाकिस्तानकडून मुनीबा अलीने सर्वाधिक 41 धावा केल्या.गोलंदाजीत दीप्ती शर्माने केवळ 10 धावा देत 5 बळी घेत आपला 350 बळींचा टप्पा पूर्ण केला.दिप्ती शर्माला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताचा पुढील सामना 17 जून रोजी लीड्स इथं नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे. तर दुसरीकडे बांगलादेशनं काल नेदरलँड्सवर सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला. फलंदाजीचा निर्णय घेत नेदरलँड्सने 20 षटकांत 8 बाद 138 धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशने 19 व्या षटकांत 4 बाद 141 धावा करत सहजपणे विजयाचे लक्ष्य गाठलं. 33 चेंडूंत 50 धावांची विजयी खेळी साकारल्याबद्दल जुएरिया फिरदौसला 'सामनावीर' पुरस्कार देण्यात आला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.